## <u>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा.</u>

## <u>जाहीर नोटीस</u>

**<u>दिनांक : ०८/०२/२०२४.</u>**

विषय :— जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तु (वापरायोग्य नसलेले लोखंडी आणि लाकडी साहित्य व लोखंडी रॅक्स्) विक्री करण्याकरीता नव्याने सिलबंद निवीदा मागविणेबाबत.

**पहा :—** १. सहायक अधिक्षक, वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची कार्यालयीन टिपणी दिनांक ०७/०२/२०२४ व त्यावरील मंजूरी आदेश.

उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन आदेशान्वये कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालयाच्या जुन्या इमारतीमधील निरुपयोगी लोखंडी रॅक्स्, लाकडी व लोखंडी साहित्याची लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. सदर लोखंडी रॅक्स्, लोखंडी व लाकडी साहित्य विक्री करतांना प्रति किलो लोखंडाचा दर नमूद करुन इच्छूक खरेदीदारांकडून दिनांक १४.०२.२०२४ चे सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सिलबंद निवीदा मागविण्यात येत आहेत. <u>विक्री प्रक्रिया केव्हाही रदद् करण्याचे सर्व हक्क मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांचेकडे राखून ठेवले आहेत.</u>

तरी इच्छूक खरेदीदारांना कळविण्यात येते की, कार्यालयाचे अटी व शर्तीच्या अधिन राहून सिलबंद निवीदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, बुलडाणा यांचे नावे दिनांक १४/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करण्यात याव्यात. दिनांक १४.०२.२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजे नंतर प्राप्त होणा—या निविदा विचारात येतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आदेशानुसार,

प्र.प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, बुलडाणा.